महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

# पक्षीमित्र

■ वर्ष सातवे ■ अंक ४ था ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ जुलै २०१७ पाने-१०

### संपादकीय

## झटकून टाक मित्रा...

आपल्या 'पक्षीमित्र'चा अंक तीन महिन्यातून एकदा प्रसिद्ध होतो आणि तो असतो जेमतेम १६ पानांचा. तरीही मजकूर जमवताना माझी धावपळ होते. कारण बहुसंख्य मित्रांची न मिळणारी मदत. मग ऐन वेळी एखाद्या लेखाचे भाषांतर, वृत्तपत्राची कात्रणे, काही वृत्तकणांची जोडणी करत पूर्तता करावी लगते.

आपले पक्षीमित्र आपले अनुभव, आपली मते प्रकट करण्यासाठी उदासीन का असावेत हे माझ्या अकलनाबाहेर आहे. मागच्या अंकात त्यांनी वेळोवेळी केलेली पक्ष्यांची सोडवणूक यासाठी **'पक्षी विमोचन'** हे सदर सुरू केले. अशा प्रसंगी आलेली अडचण, त्यांची सोडवणूक, कधी बेतलेला प्रसंग, कधी घडलेला विनोद हे लिहून पाठवणे एवढे का अवघड आहे ?

दुसरे सदर आहे **'माझी पक्षी संघटना'** त्यात आपण सभासद असलेल्या स्थानिक संघटनेची माहिती तर द्यायची आहे ना ? अजून तरी तसा मजकूर माझ्या हाती आलेला नाही.

जुलै २०१२ च्या संपादकीयात मी गुजरातमधील 'विहंग' या त्रैमासिकाच्या एका अंकात वाचकांची १० पत्रे आणि ४२ पक्षी निरीक्षण नोंदी असल्याचे नमूद करून आपल्या मित्रांनी त्यांच्या नोंदी प्रसिद्धीसाठी पाठवाव्यात असे आवाहन केले होते, पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. अनेक जण WhatsApp, Facebook वर मजकूर, प्रकाशचित्रे टाकत असतात. त्यांनी 'पक्षीमित्र' ही आपलीच जबाबदारी आहे, असे समजून त्याकडे लक्ष द्यावे ही विनंती.

आता माझ्या समोर 'Flamingo'चा एक अंक आहे तोही Bird Conservation Society, Gujrat या संस्थेकडून त्रैमासिक रूपात प्रसिद्ध होतो. त्यातही २० पक्षी निरीक्षण नोंदी आहेत. त्यातील एक फॅनटेलच्या संदर्भातील नोंद या अंकात दिली आहे. गुजरातचे पक्षीमित्र आपल्या मुखपत्रासाठी एवढे तत्पर असतात. त्या पार्श्वभूमीवर आपण मराठी मंडळी उदास का? खूप वर्षांपूर्वीचे एक नाट्यपद होते 'झटकून टाक जीवा दुबळेपणा मनाचा' अशी त्याची सुरुवात होती. त्यात थोडा बदल करून मी म्हणेन 'झटकून टाक मित्रा आळस हा मनीचा'. वाट पाहतो आपल्या प्रतिसादाची.

– दिगंबर गाडगीळ

३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक – ४२२००५

स्थिरभाष : (०२५३)२५७७९६८, चलभाष : ९८८१०७९७११, *E-mail : dgadgil09@gmail.com*

---

**पक्षीमित्रच्या संदर्भातील पत्रव्यवहार, लेख संपादकांकडे पाठवावा. प्रशासकीय बाबींबद्दल मात्र चिपळूणच्या पत्त्यावर लिहावे.**

---

## अध्यक्षीय

गेले तीन चार दिवसात पक्ष्यांना वाचविण्यासाठी मदत हवी आहे; म्हणून मुबई, पुणे, कोल्हापूर, अलिबाग येथून किमान ९ फोन आले. खंड्या, कबूतर, कोकिळा, कावळा इत्यादी पक्षी जखमी झालेले होते व त्यांना वाचविण्यासाठी मदत हवी होती. आम्ही त्यांना त्या त्या भागातील 'पक्षीमित्रां'चे फोन नंबर दिले, परंतु त्यांना सर्वच वेळी मदत मिळत नाही. या पक्ष्यांना वाचविणे, उपचार करणे व परत निसर्गात सोडणे या बाबी नेमकेपणे करणे गरजेचे आहे. काही संस्था, व्यक्ती हे काम उत्तम प्रकारे करत आहेत. हेच काम संपूर्ण महाराष्ट्रात उत्तम प्रकारे होईल, यासाठी आपण प्रयत्न करूया.

पक्षी रेस्क्यूसाठी काम करू इच्छिणाऱ्या पक्षीमित्रांची यादी बनवूया, ती आपल्या संकेतस्थळावर ठेवूया. रेस्क्युसाठी माहितीपत्र /पुस्तिका तयार करूया, तयार असतील त्या वितरित करूया. संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक शहरात/गावात असे कार्यकर्ते तयार करूया. तयारी असणाऱ्या पक्षीमित्रांनी अवश्य कळवावे.

– भाऊ काटदरे

९३७३६१०८१७

**टीप : हा अंक आपल्या मित्रांपर्यंत पोहचवा, ते सभासद होतील !**

# वर्धा येथील १७ वे विदर्भ पक्षीमित्र संमेलन

सातत्याने होणारे पक्षीमित्र संमेलन हे महाराष्ट्राचं एक वैशिष्ट्य असून प्रादेशिक पातळीवर होणाऱ्या संमेलनात विदर्भ आघाडीवर आहे. सतरावे विदर्भ पक्षीमित्र संमेलनाचे यजमानपद 'बहार नेचर फाऊंडेशन'ला मिळाले. दिनांक १० व ११ डिसेंबरला पर्यावरण पूरक जीवनशैलीचा आदर्श आपल्या सर्वांपुढे ठेवणाऱ्या महात्मा गांधीजींच्या सेवाग्राम परिसरात संपन्न झाले.

'पक्ष्यांची अवैध शिकार : सद्यःस्थिती व उपाययोजना' ही संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना होती. डॉ. व्ही. टी. इंगोले (जेष्ठ पक्षीअभ्यासक, अमरावती) यांची संमेलनाध्यक्षपदी निवड करण्यात आली. संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. पंकज भोयर (आमदार, वर्धा) हे होते. संमेलनाचे उद्घाटक मा. प्रविण परदेशी (प्रधान सचिव, म. रा.) होते. ''उपजीविकेसाठी पक्ष्यांची शिकार करण्याचे प्रकार अद्यापही सुरूच आहे. यासाठी कायद्यापेक्षा शिकाऱ्यांना रोजगाराचा पर्याय दिल्यास पक्ष्यांच्या अवैध शिकारीवर आळा बसू शकेल'' असे मनोगत मा. परदेशी सरांनी उद्घाटनात व्यक्त केले. ''निसर्गसमृद्धीवर मानवी अतिक्रमणाच्या घटना दिवसेंदिवस वाढत असून एकूणच जैवविविधता आणि पक्षीजीवन धोक्यात आलेले आहे. पक्षी जगले तरच समृद्ध पर्यावरणाच्या दिशेने आपल्याला वाटचाल करता येईल,'' असे मत संमेलनाध्यक्ष डॉ. व्ही. टी. इंगोले यांनी अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले. उद्घाटन सोहळ्याला श्री. भगवान प्रधान (मुख्य वनसंरक्षक), एम. एस. रेड्डी (वन्यजीव संरक्षक, पेंच व्याघ्र प्रकल्प), अतुल तराळे (नगराध्यक्ष, वर्धा), शैलेश नवाल (जिल्हाधिकारी, वर्धा), डॉ. गजानन वाघ (माजी संमेलनाध्यक्ष, वाशीम), डॉ. जयंत वडतकर (सदस्य, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना) उपस्थित होते. प्रा. किशोर वानखडे (अध्यक्ष, बहार नेचर फाऊंडेशन) यांनी प्रास्ताविक केले. तद्नंतर पक्षीमित्र संमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या विभिन्न स्पर्धांमध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना पक्ष्यांवर आधारित पुस्तके देऊन गौरविण्यात आले. वर्धा जिल्ह्यात पक्षी आणि पक्षी चळवळ विद्यार्थी व लोकांपर्यंत नेण्याचे कार्य ज्यांनी केले त्या मा. सुशीलचंद्र भालेराव, मा.रमेश बाकडे, मा. डॉ. एस. सी. माहेश्वरी, मा. गौरी क्षीरसागर यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी WECS, अमरावती तर्फे अमरावती जिल्ह्याची पक्षीसूची तथा संमेलन विशेषांक, वाशीम मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले.

प्रथम सत्रात 'पक्ष्यांची अवैध शिकार व व्यापार थांबविण्यात पक्षीनिरीक्षकांची व वनविभागाची भूमिका' या विषयावरील सादरीकरण सुखदेवसिंग नोते (माजी वनधिकारी, नागपूर) यांनी केले. दुसरे सादरीकरण 'सारस संवर्धन : एक आढावा' या विषयावर मुकुंद धुर्वे व संजय आकरे (गोंदिया) यांनी केले. सत्राध्यक्ष डॉ. अनिल पिंपळापुरे (नागपूर) हे होते.

द्वितीय सत्रातील पहिले सादरीकरण डॉ. व्ही. टी. इंगोले (अमरावती) यांनी 'सातपुड्यातील प्राचीन गुहाचित्रे' या विषयावर केले. द्वितीय सादरीकरणात 'सारस संवर्धन' या विषयाची विस्तृत माहिती व 'सारस : सद्य:स्थिती' सावन बाहेकर (गोंदिया) यांनी विषद केले. सत्राध्यक्ष डॉ.जयंत वाघ होते. तद्नंतर पक्षी व वन्यजीव अभ्यासक किशोर रिठे यांची प्रकट मुलाखत मनोज भोयर (मुंबई) यांनी घेतली. रिठे यांचे कार्य व भूमिका उलगडणारी हृद्य मुलाखत सर्वांना प्रेरणादायी ठरली. रात्री भोजनानंतर 'पक्षी निरीक्षण ते व्यावसायिक संशोधन' या विषयाची अभ्यासपूर्ण मांडणी पक्षीतज्ज्ञ शशांक दळवी (मुंबई) यांनी केली. छायाचित्रासोबतच पक्ष्यांचे आवाज रेकार्ड करण्याचे महत्त्व आणि त्यातील बारकावे त्यांनी विषद केले. त्यानंतर उपस्थितांना ग्रह व ताऱ्यांचा परिचय दुर्बिणीच्या सहाय्याने हेमंत धानोरकर (अंबाजोगाई) यांनी करून दिला.

दिनांक ११ डिसेंबरला भल्या पहाटे पक्षीमित्रांना वर्धा शहरापासून १५ कि.मी.वर असलेल्या 'मदन उन्नई तलावा'वर पक्षीनिरीक्षणास नेण्यात आले. पक्षी व परिसर बघून निरीक्षक सुखावले. साधारणत: साठ पक्ष्यांची नोंद यावेळी करण्यात आली. संकलित नोंदींचे वाचन युवा पक्षीअभ्यासक दर्शन दुधाने याने केले.

दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रातील सादरीकरण दीपक गुढेकर यांनी केले. त्यांचा विषय 'वर्धा शहरातील कमळ तलाव' हा होता. त्यानंतर द्वितीय सादरीकरण व मांडणी डॉ. जयंत वडतकर (पक्षीअभ्यासक, अमरावती) यांनी केली. 'विदर्भातील पक्ष्यांची अवैध शिकार : पक्ष्यांना असलेले संभाव्य धोके' हा त्यांचा विषय होता. अवैध शिकारीची व्याप्ती आणि गांभीर्य उपस्थितांच्या लक्षात आले. सत्राध्यक्ष डॉ. बाबाजी घेवडे होते.

द्वितीय अभ्यास सत्रात किरण मोरे (अमरावती) यांनी 'विदर्भातील लार्क व पिपीट पक्ष्यांचा अभ्यास' PPT द्वारे सुंदर पद्धतीने विषद केला. दुसरी अभ्यासपूर्ण मांडणी नरेंद्र लोहबरे (नागभीड) यांनी केली. 'धोकाग्रस्त सारंगागार व अवैध शिकार' हा त्यांचा विषय होता. सत्राध्यक्ष डॉ. कृष्णा लांजेवार (नागपूर) होते.

तृतीय अभ्यास सत्रातील प्रथम मांडणी पराग दांडगे (वर्धा) यांनी केली. आपल्या अभ्यासपूर्ण व सखोल मांडणीतून 'पक्ष्यांचे व्यापार : जाळे व फासेविरोधी अभियान' याचा उहापोह त्यांनी केला. तद्नंतर इच्छुकांचे सादरीकरण घेण्यात आले. सत्राध्यक्ष जयंत अत्रे (यवतमाळ) होते.

(१) पक्षी संरक्षण आणि संवर्धन चळवळ व्यापक होण्याकरिता ५ ते १२ नोव्हेंबर हा पक्षी सप्ताह पाळण्यात यावा. (२) अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांना पद्म पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे. (३)




पान ९ वर...

# गाळपेरा - पाणपक्षी अधिवास धोक्यात

धरणाचे अथवा तलावाचे पाणी जसजसे कमी होत जाते तसतसे उघड्या पडलेल्या जमिनीवर शेती केली जाते; याला 'गाळपेरा' म्हणतात. पाणलोट क्षेत्रातून वाहत येणाऱ्या तऱ्हेतऱ्हेच्या पोषक द्रव्य घटकांमुळे या पाणथळ जागा सुपीक व उत्पादनक्षम असतात. म्हणून धरणात शेती गेलेले मूळ मालक पुनर्वसनानंतरही पुन्हा पुन्हा धरणातील जमिनीकडे वळतात. मूळ मालक करीत नसल्यास इतर कुणीही ती जमीन वाहतात. काही ठिकाणी राज्यातील दूर भागातून अथवा परराज्यातून आलेले लोक प्राधान्याने डांगर टरबुजासाठी ती जमीन वाहतात. तुरळक ठिकाणी शुल्क भरून परवानगी घेतली जाते तर बहुतेक ठिकाणी अवैध पद्धतीनं कार्य चालतं. पाटबंधारे विभागाची मूकसंमती, सोयीस्कर दुर्लक्ष अथवा पुरेसे मनुष्यबळ नसणे, असे देखील असू शकते.

कालव्याद्वारा पाणी देणे प्रारंभ होताच साधारणत: नोव्हेंबर-डिसेंबर पासून गाळपेरा प्रारंभ होतो. पाणी पुढे पुढे आणि लागवड मागे खेटून असा हा प्रकार मार्च-एप्रिलपर्यंतही चालतो (अर्थात पिकानुसार). या कालावधीतच पाणथळ जागा स्थानिक तसेच स्थलांतर करून आलेल्या पक्ष्यांनी गजबजून गेलेल्या असतात. फेब्रुवारी अखेर यातील बरेचसे प्रवासी परत फिरलेले असतात. स्थानिक काही पाणपक्ष्यांना वीण डोहाळे लागलेले असतात. प्रत्येक प्रजातीपरत्वे हा वीण काळ फेब्रुवारी ते जूनपर्यंत असतो.

नदीसूरय (रिव्हरटर्न), छोटा सूरय (लिटील टर्न), छोटा आर्ली (स्मॉल प्रॅटीनकोल), शेकाट्या (ब्लॅक विंग्ड स्टीव्ट), छोटा कंठेरी चिखल्या लिटील रिब्ड् प्लोवर), केंटीश चिखल्या (केंटीश प्लोवर), लाल गाठीची टिटवी (रेडवॅटल्ड लॅपवींग), रंगीत पाणलावा (ग्रेटर पेंटेड स्नाईप) यासह आणखी काही पाणपक्षी पाणथळ जागेनिकट जमिनीवर अंडी घालतात, अथवा पाणवनस्पतीमध्ये. बहुधा ती त्यांची संमिश्र वसाहतच असते. या वसाहतीत शेकड्यांनी पाणपक्षही असू शकतात आणि त्या धरणाच्या भिंतीच्या बाजूला नव्हे तर मागच्या बाजूला (बॅक वॉटर एरीया) अथवा उथळ क्षेत्रात असतात. कारण उथळ भागात सूर्यप्रकाश तळापर्यंत पोहचत असल्यामुळे हळूहळू तिथे एक परिसंस्था विकसित झालेली असते. पाणवनस्पती, शैवाल, मृदशरीरी जीव, शंख-शिंपले, कीटक, बेडूक, खेकडे व अन्य कणाहीन प्राणी तिथे असतात, असा सूक्ष्म अधिवास पाणपक्ष्यांसाठी आदर्श असतो. आणि अशाच अधिवासात अथवा अश्या अधिवासातील बेटांवर ह्या वीणवसाहती असतात. प्रजोत्पादनासाठी वीणपरिसर आणि अन्न या दोन महत्वपूर्ण बाबी असतात. सुरक्षित जागा आणि भरपूर अन्न यांवर प्रजोत्पादनाचं यश अवलंबून असतं. धरणाच्या मागील बाजूस निर्जनतेमुळे मिळणारा निवांतपणा आणि चिखलांना पडलेल्या पोपड्यांमध्ये असलेले भरपूर खाद्य या बाबींमुळे बहुतेक ठिकाणी अश्या वसाहती आढळून येतात. यायच्या.

Global figures for the latest IUCN Red List of Threatened Species
Total Species Assessed = 85,604
(Total threatened species = 24,307)
Extinct = 860
Extinct in the Wild = 68
Critically Endangered = 5,210
Endangered = 7,781
Vulnerable = 11,316
Near Threatened = 5,498
Lower Risk/conservation dependent = 238 (this is an old category that is gradually being phased out of the IUCN Red List)
Least Concern = 40,920
Data Deficient = 13,713

अलीकडे वाढलेल्या गाळपेऱ्यामुळे 'हे अधिवास' संकटात सापडले आहेत. उघड्या पडलेल्या जमिनीची उत्पादन क्षमता लक्षात आल्यामुळे, पाणी (सहज) उपलब्ध असल्यामुळे गाळपेरा वाढलेला आहे.

बऱ्याच ठिकाणी खरीप पिकानंतर स्वजमिनीकडे दुर्लक्ष करून गाळपेरा करण्यात चढाओढ लागलेली दिसते. भूमिहीन परंतु जमीन कसण्याची इच्छा असलेले आणि सहज उपलब्धतेमुळे इकडे वळलेले आढळतात.

रबी पिकांसह भाजीपाला व डांगराची शेती केली जाते. डांगराची शेती करणारे बिऱ्हाडांसोबत आलेले असतात आणि पाच-सहा महिने त्यांचा पडाव तेथेच असतो. या मानवी वावरासह, कुत्रे, गुरेढोरे, नांगरणी-वखरणी, रासायनिक फवारणी, मालाची ने-आण यांसह काही ठिकाणी झिरो फिशिंग नेटचा मोठ्या प्रमाणात वापर करून मासेमारी केली जाते. या सर्व बाबींचा परिणाम होऊन अधिवासाचा ऱ्हास होत असून अनेक ठिकाणी पाणपक्ष्यांची वीण संकटात सापडल्याचे निदर्शनास येत आहे. याची झळ पक्ष्यांसोबत वन्यप्राण्यांनाही पोहोचलेली आहे. एकतर उन्हाळ्यात पाणी नाही आणि आहे तिथं पोहोचता येत नाही. दिवस-दिवस प्राणी पाण्याकरिता खोळंबल्याचे केविलवाणे दृश्य पहायला मिळते. याशिवाय पीक संरक्षणाच्या पारंपरिक पद्धतीसह आणखी काही प्रकार आढळून येतात - त्यातला एक प्रकार म्हणजे दिवस-रात्र स्पीकरवर गाणी वाजवणे! उडत्या चालीची कर्कश्य आवाजातील ही गाणी एकांत आणि निवांत चिरत वाजत राहतात. या अशा स्थितीत गाळपेरा हा वाळू उपश्या एवढाच गंभीर प्रश्न बनतो. वाळू उपश्याची जेवढी चर्चा होते तेवढी गाळपेऱ्यामुळे होणाऱ्या अधिवास शोषणाची होत नाही, एवढेच!

तलाव अथवा धरणाची मागील बाजू (बॅक वॉटर एरीया) हा निसर्गातला अत्यंत नाजूक, महत्त्वाचा आणि सूक्ष्म अधिवास आहे. नियमित शेतीमुळे हा अधिवास वारंवार बाल्यावस्थेत जातो. गाळपेऱ्यासाठी परवानगी देताना पक्षीअधिवासाचा प्राधान्याने विचार होणे गरजेचे आहे. सर्वात प्रथम 'या पाणथळ जागा' माणसांसाठी आहेत की पशू-पक्ष्यांसाठी हे आधी निश्चित करावे लागेल. शेतकरी की पक्षी? असा वाद उपस्थित होईल. परंतु नियंत्रित गाळपेरा राहिल्यास अंतिमत: तो मानवी हिताचाच असेल.

*पान ९ वर...*

# एका अनाहुत पाहुण्याची कथा

नेहमीप्रमाणे माझा शिकवणीचा वर्ग चालू होता. अर्थात हा वर्ग घरगुती असल्यामुळे सहा-सात मुला-मुलींचीच एका मोठ्या टेबलाभोवती बसून आमची शिकवणी चालली होती.

या टेबलालगतच्या भिंतीवर अडीच-तीन फूट उंचीची छोटी कपाटे आहेत. पाहुणे आलेल्या वेळी वापरात येणाऱ्या कपबशा, ग्लासेस, बाऊल्स, यासारख्या वस्तू त्यात ठेवलेल्या असतात. त्यामुळे अडीच-तीन फूट एवढीच त्यांची उंची आहे.

त्या दिवशी मी शिकविण्यात आणि मुलं शिकण्यात दंग होतो. कारण राजा रविवर्मा व स्वामी विवेकानंद यांच्या भेटीवर आधारित रणजित देसाई यांचा 'अपूर्व भेट' हा रंगतदार धडा चालला होता. अचानक खिडकीतून एक पक्षी आत आला, आणि कपाटावर जाऊन बसला. आकाराने छोटासा होता. पण भरपूर रंगांचा, आणि अंगावर छोटंसं ठिपकेवजा डिझाइन असलेला, अतिशय देखणा दिसत होता. त्याला पाहिल्यानंतर मुलांचंच काय, पण माझंही लक्ष पुस्तकातून बाहेर पडलं, आणि त्या गोड दिसणाऱ्या पक्ष्यावर स्थिरावलं! मुलं तर इतकी बेभान झाली, की अभ्यास बाजूलाच राहिला.

त्याच वेळी खिडकीच्या जाळीवर तीन-चार कावळे काव-काव करीत आलेले दिसले. त्यांना हाकलून देण्यासाठी खिडकीजवळ गेले. आमच्याच सोसायटीतल्या आमच्या शेजारच्या इमारतीच्या भिंतीवर, पॅरापेटवर, खिडक्यांवरही बसलेले पंचवीस-तीस कावळे काव-काव करीत आहेत, असं दिसलं. ते पाहिल्यावर एकदम लक्षात आलं की, हे सारे कावळे त्या बिचाऱ्या चिमुकल्या पक्ष्याच्या मागे लागले असावेत, आणि तो बिचारा जीव वाचविण्यासाठी आमच्या घरात शिरला असावा.

खिडकीवरच्या कावळ्यांना तिथून घालवलं, तर तेही समोरच्या इमारतीवरील आपल्या साथीदारांना जाऊन मिळाले आणि 'काव-काव'चा कर्कश ओरडा चालूच ठेवला.

त्या चिमुकल्या पक्ष्याकडे लक्ष देऊन पाहिलं, तर भीतीने त्याची छाती धपापत वर-खाली होत आहे, असं वाटत होतं. जीव मुठीत घेऊनच बसला होता!

''मॅडम, इतका मस्त पक्षी आहे, आणि स्वतः तुमच्या घरी आला आहे. त्याला पिंजऱ्यात ठेवा म्हणजे तो तुमच्याकडे राहील.'' माझे विद्यार्थी - विद्यार्थिनी मला सल्ला देत होते.

मी मुलांना प्रश्न केला, ''अरे, आपल्याला कोणी कोंडून ठेवून आपलं स्वातंत्र्य हिरावून घेतलं, तर ते आपल्याला आवडेल का?''

''नाही मॅडम! पण तो पक्षी आहे. तो पिंजऱ्यात आरामात राहील. आणि त्या कावळ्या- बिवळयांची भीती पण राहणार नाही त्याला!'' मुलांची प्रतिक्रिया आली.

ती ऐकल्यावर मी त्यांना समजावलं, ''हे बघा, पक्षी असो किंवा माणूस असो. प्रत्येकाला स्वातंत्र्यच प्रिय असतं रे! या पक्ष्यालाही पिंजऱ्यात राहण्यापेक्षा मोकळ्या आकाशात उडायला आवडणार. मला असं वाटतं, की, तो चुकून आपल्या बरोबरच्या सोबत्यांपासून वेगळा झाला असावा. त्यांच्याकडे जावं, असंही त्याला वाटत असणार.''

माझं बोलणं मुलांना पटलं असावं. ती शांत झाली. त्यानंतर, त्या पक्ष्याची व्यवस्था कशी नि कुठे लावावी, असा प्रश्न माझ्यापुढे उभा राहीला. विचार करता करता माझ्या बहिणीच्या मुलाच्या (डॉ. राजीव झणकर यांच्या) मित्रपरिवारातील डॉ. विनिता कुलकर्णी या व्हेटरनरी डॉक्टरची आठवण झाली. ती काहीतरी उपाय सुचवील, म्हणून बहिणीकडून तिचा कॉन्टॅक्ट नंबर घेऊन तिला फोन केला, व माझी समस्या सांगितली.

तिने लगेच आपल्या मदतनिसाला माझ्या घरी पाठवलं. अगदी सहजपणे मोठ्या कौशल्याने त्याने त्या पक्ष्याला आपल्या बास्केटमध्ये उचललं. आता तो पक्षी विनितासारख्या योग्य व्यक्तीच्या ताब्यातच गेला होता.

कावळ्यांपासून स्वतःचा बचाव करताना त्या पक्ष्याला जखम झाली होती. तिच्यावर योग्य ते उपचार करून डॉ. विनिताने त्याला माहीमच्या 'नेचर पार्क'मध्ये पाठविले. तिच्याकडून ही माहिती मिळाली की, तो पक्षी स्थलांतर करून आलेला व 'कोका-टेल' या जातीचा होता.

एका चिमुकल्या पक्ष्याचा जीव कावळ्यांपासून वाचवण्यात यश आलं, आणि तो सुरक्षित निवाऱ्याच्या जागी पोहोचला, याचंच मानसिक समाधान या प्रसंगामधून मिळालं!

सौ. नीलिमा शशिकान्त नाडकर्णी, मुंबई.
(फोन - २४३०९५४४)

# फॅनटेल पक्ष्याने घेरले शिकारी पक्ष्यांना

७ जुलै २०१३ रोजी आणंद जवळच्या चिकोद्रा खेड्यात पक्षी निरीक्षकांना काही वेगळाच प्रसंग अनुभवाला आला. कडूनिंबाच्या झाडावर एक हनी बुझार्ड पक्षी (Pernis ptilorhynchus) बसलेला होता, आणि एक फॅनटेल पक्षी (Rhipidura aureola) चक्क त्यावर हल्ला करीत होता! फॅनटेल बुझार्डच्या पाठीवर बसून चोचीने टोचत होता. काही वेळ बुझार्डने फॅनटेलकडे लक्ष दिले नाही. पण नंतर तो त्रासला आणि उडून जाऊ लागला. फॅनटेलने त्याचा पाठलाग सुरू केला. बुझार्ड लांबवर एका खांबावर जाऊन बसला तिथे त्याच्यावर हल्ला चालू ठेवला. बुझार्डने एक पंख फटकारून त्याला हाकलण्याचा प्रयत्न केला. पण फॅनटेलने हल्ला चालूच ठेवला. थोड्या वेळाने बुझार्डने पंख पसरले. हवेत झेप घेतली तरीही तो दूर जाईपर्यंत फॅनटेल त्याच्या पाठलागावर होता.

तसाच प्रकार वडोदरा जवळच्या जंबूघोडा अभयारण्यात १२ एप्रिल २०१४ रोजी बघायला मिळाला. तिथे फॅनटेल पक्ष्याने क्रेस्टेड सर्प ईगल (Spilornis cheela) वर हल्ला केला होता. गरूड पक्षी त्रासला आणि उडून जाऊ लागला तरीही फॅनटेलने काही अंतरापर्यंत त्याचा पाठलाग केला.

फॅनटेल हा काही शिकारी पक्षी नाही. पण विणीच्या हंगामात (फेब्रुवारी ते ऑगस्ट) तो आक्रमक होतो. घराजवळ इतरांना फिरकू देत नाही. मांजर, कावळे, इतकेच काय तिथे येऊ पाहणाऱ्या माणसावर तार स्वराने चित्कारत हल्ला करायला मागे पुढे पाहात नाही.

(Flemingo वरून)

# अंजनेरी संवर्धित क्षेत्र घोषित झाल्याने गिधाड संवर्धनाला 'बुस्ट'

ममदापूर, बोरगडनंतर अंजनेरीचे ५ हजार ६९३ हेक्टर वनक्षेत्र हे संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून जाहीर झाले आहे. त्यामुळे आता या परिसरातील गिधाड आणि दुर्मिळ वनस्पती यांच्या संवर्धनाला बळ मिळणार आहे. या योजनांसाठी अंजनेरीला विशेष निधी प्राप्त होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे एकाच जिल्ह्यात तीन संवर्धन क्षेत्र असलेला नाशिक जिल्हा हा राज्यातील एकमेव जिल्हा ठरला आहे.

नाशिक-त्र्यंबकेश्वर तालुक्यातील अंजनेरी संवर्धन क्षेत्र जाहीर करण्याच्या प्रस्तावावर अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. यासंदर्भात शासनाकडे प्रस्तावही पाठविण्यात आला होता. येथील दुर्मिळ वनस्पती, वन्यजीव आणि विशेषत: गिधाडांच्या संवर्धनासाठी या प्रस्तावाला महत्त्व प्राप्त झाले होते.

हा प्रस्ताव मंजूर करताना अंजनेरी क्षेत्र संवर्धित झाल्याचे शासकीय आदेश वनविभागाला प्राप्त झाले आहेत. त्यामुळे यापुढे या क्षेत्राच्या विकासाला अधिक गती येणार आहे. यापुढे संवर्धित क्षेत्रात सहजासहजी



कुणालाही प्रवेश करता येणार नाही. येथील वनक्षेत्र संवर्धित करण्यासाठी स्थानिक ग्रामपंचायत, वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी यांची प्राधिकृत समिती गठित करण्यात आली आहे. ही समिती संपूर्ण क्षेत्राची देखभाल करेल. तसेच पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्या घटकांना पायबंद घालेल.

**गिधाडाला मिळते कायदेशीररीत्या संरक्षण**

राज्यात गिधाडांची उल्लेखनीय संख्या ही अंजनेरीत आहे. गिधाड हा स्वच्छतेचे काम प्रभावीपणे पार पाडणारा निसर्ग अन्नसाखळीतील अत्यंत महत्त्वपूर्ण पक्षी आहे. निसर्गचक्रात मृत पावलेल्या प्राण्यांची विल्हेवाट लावणे, कुजलेले मांस खाणे हे गिधाडाचे काम आहे. या भागात इजिप्शियन, भारतीय लांब चोचीचे गिधाड, पांढऱ्या पुठ्याचे गिधाड आदी प्रकारची गिधाडे आढळतात. गिधाड पक्ष्यांना वन्यजीव (संरक्षण) कायदा, १९७२ मधील अनुसूची ४ मधून अनुसूची १ मध्ये समाविष्ट करून त्यास कायदेशीररीत्या संरक्षण प्राप्त करून दिलेले आहे.

**खोरीपाड्यातील उपाहारगृहामुळे वाढली गिधाडांची संख्या**

लुप्त होण्याच्या स्थितीत असलेली गिधाडांची घरटी तसेच त्यांचा आढळ असलेल्या ठिकाणांची माहिती घेऊन हरसूल तालुक्यातील मौजे खोरीपाडा येथे संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या सहकार्याने वनविभागाने २०११ मध्ये राज्यातील गिधाडांसाठीचे पहिले उपाहारगृह सुरू केले. या उपाहारगृहाच्या संकल्पनेमुळे जिल्ह्यात गिधाडांची संख्या लक्षणीय वाढल्याचे वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत खैरनार यांनी सांगितले. नैसर्गिकपणे मृत पावलेल्या (डायक्लोफिनेक औषधाचे अंश नसलेले) पाळीव प्राण्यांचे मांस त्यांना या ठिकाणी उपलब्ध केले जाते. त्यावर ताव मारण्यासाठी येणाऱ्या गिधाडांबरोबर त्यांची घरटी आणि पिल्लांची संख्या वाढल्यामुळे या प्रजातीचे संवर्धन करण्यास उपाहारगृह महत्त्वाची भूमिका निभावत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याकरिता अर्धा एकर जागेत संरक्षक जाळी बसविण्यात आली. उपाहारगृह कार्यान्वित झाल्यावर गिधाडांनी भेट देऊन त्यांच्यासाठी ठेवलेल्या भोजनाचा आस्वाद घेणे सुरू केले. या संदर्भात स्थानिक ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली. कुठेही पाळीव प्राण्याचा मृत्यू झाल्यास आधी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत तपासणी आणि डायक्लोफिनेक औषधाची मात्रा नसल्याची खात्री केल्यावरच वनविभाग ते स्वखर्चाने उपाहारगृहात नेत असल्याची माहिती प्रशांत खैरनार यांनी दिली.

राज्यात गिधाडांची संख्या ४००, अंजनेरीत १५०. (दिव्य मराठीवरून)

# चीन मधून आफ्रिकेत

सामान्य कोकीळ (Cuculus canorus) पक्ष्याची जन्मभूमी बिजिंगगवळची. उडण्यात पटाईत अशी त्यांची ख्याती नाही. तरी स्थलांतर करून ते भारतात जातात असा समज होता. तरीही नक्की हे पक्षी जातात कुठे हे जाणण्यासाठी चीनमध्ये राहणारे एक ब्रिटिश पक्षी निरीक्षक टेरी टाऊनशेंड यांनी एक उपक्रम आखला. त्यांनी नोव्हेंबर २०१६ मध्ये काही नर-मादी पक्षी पकडले. त्यातील पाच पक्ष्यांना संवेदक (sensors) बसवले, ज्यांचा मागोवा उपक्रमाकडून घेता येणार होता. पक्ष्याचे वजन ३.५ औंस तर संवेदकाचे ०.१६ औंस. पक्ष्यांचे नामकरणही झाले. फ्लॅपी मॅक फ्लॅपरसन, स्कायबाँब बोल्ट, होप, झिगुई आणि मेंग झी झुऑन (स्वप्नपक्षी). हे पक्षी मऊमऊ अळ्या खाऊन धष्टपुष्ट झाले. चीनमधील शहरीकरण प्रदूषण याचा पक्ष्यांवर होणारा परिणाम हाही अभ्यासला जाणार होता. म्हणून या उपक्रमाला अर्थसहाय्य मिळाले होते.

पक्ष्यांना तर सोडले. आता प्रतिक्षा होती उपग्रहावरून ते कुठे आहेत हे जाणून घेण्याची. ऑगस्टमध्ये फ्लॅपी दक्षिणेकडे असल्याचे कळले. यापूर्वी होप रशियाकडे गेल्याचे समजले होते. पण नंतर संदेश नव्हता. झिगुईचा संदेश तर बिजिंगजवळच बंद झाला होता. टाऊनशेंड उपग्रहाकडून मिळणाऱ्या माहितीच्या मागावर होतेच.

स्प्टेंबरच्या मध्याला स्कायबाँब आणि फ्लॅपी भारतात पोहचले होते. ते आता पश्चिमेकडे जाणार असे संकेत होते. पण कोणत्या मार्गाने ?

पहिले उत्तर मिळाले ऑक्टोबरच्या उत्तरार्धात. स्कायबाँबने मध्य भारतातून हिंद महासागरावरून जाणारा मार्ग धरला होता. आता त्याचे लक्ष्य आफ्रिकेचे असावे. या छोट्याशा पक्ष्याचा समुद्रावरचा दीर्घ प्रवास म्हणजे जुगारच होता. हजारांहून अधिक मैलांचा प्रवास त्याच्यासमोर होता. भारतातील मुक्कामात पावसाळ्यात त्याला भरपूर खाद्य मिळाले होते. त्याला परतीच्या मान्सून वाऱ्याचे सहाय्य मिळणार होते, त्याची तो वाट पाहत असावा. तो वारा पाठीवर घेऊन सुमारे २६०० फूट उंचावरून वाट काढत, तो आफ्रिकेत जाणार होता. चीनमधून सुरुवात केल्यावर ६४ दिवसांनी तो सोमालियाच्या किनाऱ्यावर थडकला होता. त्या पाठोपाठ फ्लॅपी आफ्रिकेत पोहचला.

अशी तऱ्हेने कोकीळ कुठे जातो हे गूढ उकलले होते. या वर्षीही अर्थसहाय्य उपलब्ध झाले तर पुन्हा काही कोकीळ पक्षी यंत्र बसवून मुक्त केले जाणार होते, या मे महिन्यात.


स्वागत -

# सजीवांचा नामदाता
# कार्ल लिनिअस

आपले सातारा येथील एक सभासद डॉ. उमेश करंबळेकर यांनी लिहिलेले 'कार्ल लिनिअस' हे पुस्तक नुकतेच राजहंस प्रकाशनाकडून प्रसिद्ध झाले आहे. त्या काळात माहीत असलेल्या सजीवांचे वर्गीकरण व नामकरण लिनिअसकडून झाले, एवढेच निसर्गप्रेमींना माहीत होते. पण त्यांच्या जीवनक्रमाबद्दल अंधुकशी कल्पनादेखील नव्हती. डॉ. करंबेळकरांनी त्यांचा जीवनपटही येथे मांडला आहे. ती माहिती मिळवण्यासाठी त्यांना खूप प्रयास करावे लागले. लिनिअसची माहिती मिळवणे, त्यातील तुकडे जुळवणे व प्रत्यक्ष लेखन करणे यात पाच-सहा वर्षांचा कालावधी गेला.

कार्लचा जन्म १७०७ च्या मे महिन्यातला होता. तो स्वीडनच्या स्मालँड या आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या प्रांतातला. कार्लच्या मामांना बागकामाची प्रचंड हौस होती. त्यांनी कार्लच्या वडिलांच्या मनात ते वेड रूजवलं, त्याचं भव्य रूप झालं कार्लच्या कर्तृत्वात.

त्यानं धर्मोपदेशक व्हावं असं त्याच्या वडिलांच्या मनात होतं. त्याचप्रमाणे त्याला शाळेत घालण्यात आलं. पण त्या शिक्षणात तो रमला नाही. त्याला आवड होती पानाफुलांची, वनस्पती जगाची. तेव्हा त्यानं वैद्यकशास्त्राचा अभ्यास करावा असा सल्ला मिळाला. वैद्यकशास्त्र हा निसर्गशास्त्राचा एक भाग होता. त्याकाळी त्यानं लुंड विद्यापीठात वैद्यकशाखेत प्रवेश घेतला. तेव्हापासूनच त्याच्या अडचणी सुरू झाल्या. पण पुढच्या काळात देखील प्रत्येक अडचणीच्या वेळी त्याला एखादी मोठी व्यक्ती भेटली, जी त्याच्या मदतीला धावून आली. तिथून तो 'अपसाला विद्यापीठा'त गेला. तिथे शिकत असतानाच फुलामधील स्त्रीकेसर आणि पुंकेसर यांच्या संख्येवर आणि रचनेवर आधारित असं वनस्पतींचं वर्गीकरण करता येईल, असं त्याच्या मनानं घेतलं. तिथेच त्याला वनस्पती उद्यानात विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी सहाय्यक म्हणून नेमणूक मिळाली. त्याची शिकवण्याची हातोटी उत्तम अशी होती. याच सुमारास लापलँडची मोहीम एकट्यानं करण्याचा प्रस्ताव त्याच्यासमोर आला. त्या अतिशय अडचणीच्या प्रदेशातील एकहाती मोहीम म्हणजे दिव्यच होतं. या मोहिमेत वनस्पतीच्या जोडीनं पशूपक्षी, खनिजं यांच्या नोंदी त्याने केल्या. एखादं काम स्वीकारलं की ते उत्तम प्रकारे पार पडण्यावर त्याचा कटाक्ष असे. जास्तीत जास्त नमुने आणण्यावर त्याचा भर असे. पुढे जेव्हा त्याचे विद्यार्थी मोहिमेवर जात तेव्हाही त्याची अपेक्षा तीच असे.




*सजीवांचा नामदाता कार्ल लिनिअस*
*लेखक : डॉ. उमेश करंबेळकर*
*प्रकाशक : राजहंस प्रकाशन, पुणे*
*पृष्ठे : १४६, किंमत : ₹ १६०/-*

त्या काळात वनस्पतींची शास्त्रीय नावं फार बोजड पद्धतीनं दिली जात. लिनिअसनं ती ढिसाळ पद्धत दूर सारून द्विनाम पद्धत सुरू केली. त्या पद्धतीत पहिलं पद हे जातीचं तर दुसरं असतं प्रजातीचं. प्रजातीचं नाव देतांना लिनिअसने अनेक मित्रांची, संशोधकांची नावं देऊन त्यांचा गौरव केला. (ही नावं लॅटीन भाषेत असत. अजूनही ती भाषा वापरली जाते.) वनस्पतींचं नामकरण करून तो थांबला नाही तर त्यानं पशू, पक्षी, कीटक जलचरांचंही बारसं केलं. ही पद्धत पुढे जगभरात स्वीकारली गेली. त्याचा महत्त्वाचा फायदा म्हणजे जगभरात कुठेही त्या नावावरून तीच प्रजाती समोर येते. नाहीतर स्थानागणिक त्याला वेगवेगळी नावं असतात व त्यावरून इतरांना बोध होत नाही.

लिनिअसनं अनेक ठिकाणी वनस्पती उद्यानं विकसित केली. स्टॉकहोममध्ये जोरदार वैद्यकीय व्यवसाय केला. राजवैद्य म्हणून नेमणूक मिळाली. एकंदर संपन्नता आली. समाजात सन्माननीय स्थान झालं. वैवाहिक जीवनाला सुरुवात झाली.

लिनिअसनं वनस्पतींसंबंधी डझनभर पुस्तकं लिहिली. त्यांच्या जोडीला पक्षी, प्राणी/वैद्यकशास्त्र यावर ग्रंथ केले. त्याची लेखनशैली आकर्षक होती.

१० जानेवारी १७७८ रोजी वयाच्या ७० व्या वर्षी निधनं झालं. मागे राहिली त्याची द्विनाम पद्धती. पुस्तकातून काही विशेष माहिती हाती आली. अलीकडे पक्ष्यांसाठी, खास करून चिमण्यांसाठी घरटी तयार ठेवण्याची चळवळ सुरू झाली आहे. पण १७४१ मध्ये गोटलँडमधील शेतकरी घराजवळ पक्ष्यांच्या घरट्यांसाठी पेट्या लटकून ठेवत होते.

काही वर्षांपासून आपल्याकडे रंगाऐवजी भिंतींना वॉलपेपर लावण्याची टूम आली आहे. पण अडीचशे वर्षांपूर्वी लिनिअसने आपल्या शानदार घरात वॉलपेपर लावले होते.


सजीवांच्या नामदात्याचं वेधक चरित्र डॉ. करंबेळकरांनी आपल्या हाती दिलं आहे. त्यांना धन्यवाद!

– दिगंबर गाडगीळ

**स्वागत -**

# पक्षीमित्र नोंदवही

आपण निसर्गाला शिक्षक मानतो. निसर्ग निरीक्षण करून आपण बऱ्याच वेळा भविष्यात येणाऱ्या गोष्टींचे अंदाज बांधू शकतो. मागील आठवड्यातील एक गोष्ट आहे. मे महिन्याच्या पहिल्या आठवडयात सकाळी फिरून येताना माझ्या मित्राच्या बिल्डिंगच्या प्रांगणात चक्क Indian Pitta (नवरंग) पक्षी आढळून आला. तसा तर नाशिक परिसर हा पक्षी फारसा दिसत नाही. पण त्यामुळे संकेत असे मिळाले की पुढील चार ते पाचच दिवसांत येथे वळवाचा पाऊस सुरू झाला. नवरंग पक्षी त्याच्या घरट्याची तयारी वळवाच्या पावसादरम्यान करतो, हे निरीक्षण मी जेव्हा आपला ग्रुपमध्ये शेअर केले, तर मागील काही वर्षात ह्याच वेळेस नवरंग हा पक्षी नाशिक येथे दिसल्याचे लक्षात आले. पण योग्य त्या नोंदी अभावी ही माहिती ज्ञात नव्हती.




*पुस्तकाचे नाव - पक्षीमित्र नोंदवही*
*लेखक - श्री. अनिल माळी*
*प्रकाशन - नेस्ट प्रकाशन, नाशिक*
*पृष्ठे - ८८, किंमत ₹ १००/-*

नेमकी हीच गोष्ट हेरून नाशिक येथील पक्षी निरीक्षक श्री. अनिल माळी यांनी ‘पक्षीमित्र नोंदवही’ या उपयुक्त नोंदवहीचे प्रकाशन केले. हे प्रकाशन १३ एप्रिल २०१७ या तारखेस झाले. या प्रसंगी बोलताना नाशिकचे ज्येष्ठ पक्षीनिरीक्षक श्री. दिगंबर गाडगीळ यांनी सांगितले की, पक्षीमित्रांमध्ये तीन प्रकारची वर्गवारी होऊ शकते. एक म्हणजे पक्ष्यांबद्दल उत्सुकता असणारे ते पक्षीप्रेमी, दुसरे म्हणजे पक्षी निरीक्षण करणारे व त्यासंदर्भात अभ्यास करणारे ते पक्षी निरीक्षक. तसेच पक्ष्यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास, त्यांची जीवनशैली व पुनरुत्पादन संबंधीचा शास्त्रीय अभ्यास करणारे हे पक्षी अभ्यासक (Scientists) हे होय. बऱ्याच वेळेस पक्षी निरीक्षणाने व त्याच्या टिपण्णींमुळे पक्ष्यांच्या संबंधीच्या अभ्यासास हातभार मिळतो. पक्षी निरीक्षक व पक्षी अभ्यासक यांच्यातील दुवा साधणाऱ्या या ‘पक्षीमित्र नोंदवही’चे अभ्यासू लेखक श्री. अनिल माळी यांना आपण धन्यवाद द्यायला हवे.

८८ पृष्ठे असलेल्या या ‘पक्षीमित्र नोंदवही’मध्ये सुमारे १४५ पक्ष्यांची रंगीत चित्रे, इंग्रजी नावांसकट आहेत, ज्याद्वारे आपण पक्ष्याची योग्य ती ओळख करून घेऊ शकतो. त्यानंतर ज्या अभ्यासक्षेत्राची आपण नोंद घेत आहोत त्यासंबंधी माहिती, निरीक्षणासाठी वापरलेल्या सहित्याची माहिती, तारीख व वेळेनुरूप टिपण्याची सोय करून दिली आहे. तसेच त्या भागातील विविध जैवविविधतेचीसुद्धा टिपणी करून ठेवणे आवश्यक असते व सर्वात महत्त्वाचे म्हणजे निरीक्षण तक्ता, प्रत्यक्ष पक्षी निरीक्षण करताना कच्चे काम करण्यासाठीचा तक्ता. पक्षी प्रजातीचे नाव, नोंदवेळ, संख्या, नरमादी, पक्ष्यांची हालचाल इत्यादी गोष्टी टिपून ठेवण्यासाठी तक्ता दिला आहे. अशा विविध तक्त्यांच्या निरीक्षणानंतर त्या भागातील पक्ष्यांची सर्वांगीण माहिती (Consolidated Report) करून ठेवण्यासाठी ‘संकलित नोंदतक्ता’देखील उपलब्ध केला आहे. यामध्ये महाराष्ट्रात सापडणाऱ्या जवळ जवळ ५७७ विविध पक्ष्यांची नोंद आपण करू शकतो. याप्रमाणे वर्षभराच्या नोंदी एका पुस्तिकेत होऊ शकतील.

मित्रांनो, आपल्यासारख्या हौशी पक्षी निरीक्षकाला एका अभ्यासू पक्षी निरीक्षकामध्ये रूपांतरित करण्यासाठी ‘पक्षीमित्र नोंदवही’ ही अतिशय उपयुक्त पुस्तिका उपलब्ध झाली आहे.

– सतीश गोगटे (फोन : ९८२२०५९९९२)

---

# अक्षता आणि पक्षी

‘माझ्या लग्नात मी अक्षता उधळू का? त्याने पक्ष्यांना इजा होईल का?’ असा प्रश्न अमेरिकेतील एका भारतीयाने विचारला होता. लग्नामध्ये हळदीने माखलेले तांदूळ अक्षता म्हणून वापरले जातात. लग्नसमारंभ आटोपला की या अक्षता केराबरोबर बाहेर फेकल्या जातात पक्षी त्या खातात तेव्हा त्यांना इजा होईल का? हा प्रश्नकर्त्याचा सवाल होता.

या प्रश्नावर काही उत्तरे आली. त्यात त्यांनी म्हटले होते की, अनेक पक्षी कच्चे धान्य खातात पण त्यांना त्याचा त्रास होत नाही. किंबहुना पक्षी निसर्गात कच्चे दाणेच खात असतात.

केंचुकी विदयापीठातील जीवविज्ञानशास्त्राच्या विद्यार्थ्यांचे मतही तसेच होते. तरीही त्यांनी अनेक प्रयोग केले. त्यात त्यांनी तीन प्रकारचे तांदूळ (गावठी, बासमती आणि जसमिन) चार तऱ्हेचा ब्राऊन तांदूळ (लांबडा, मध्यम, छोटा आणि गोड) आणि पाच प्रकारचे तांदळाचे पदार्थ वापरून पाहिले. उद्देश हा होता की सत्य काय आहे, हे शोधायचे.

त्यांना असे दिसले की ब्राऊन आणि पांढरा तांदूळ खूप फुलू शकत असला तरी त्याने पक्ष्यांना त्रास होत नाही. आपल्या प्रयोगातून हाती आलेली माहिती त्यांनी प्राध्यापकांपुढे, तसेच जिथे मोठ्या प्रमाणावर कबुतरे पाळली जात होती अशा पक्षीशाळा प्रमुखापुढे मांडली. पक्षीशाळेत तर कबुतरांना केवळ पांढरा तांदूळ आणि पाणी दिले जात असे. त्यांना कधीच पोटदुखी, पोटफुगी असला त्रास होत नव्हता किंवा घशात अडकले आहे किंवा ते तांदूळ ओकून टाकतात, असे दिसले नव्हते.

कच्चा तांदूळ खाल्ल्याने पक्ष्यांना त्रास होतो असा समज अमेरिकेत का झाला आहे?

याचा अर्थ लग्न समारंभात अक्षता उधळण्याचे समर्थन करण्याचा इरादा नाही. अक्षता टाकणे हे शुभ सूचक असले तरी त्यामुळे धान्याची उधळपट्टी होते हे निश्चित. त्याऐवजी केरळात वधुवरांवर पुष्पवृष्टी करतात. ही पद्धत योग्यच म्हटली पाहिजे.

टपाल तिकिटांच्या दुनियेत -

# विदेशी पक्षी (Exotic Birds)










शुक (पोपट) हा अत्यंत लोकप्रिय पक्षी आहे. तो तरुण तसेच वृद्धांच्यासुद्धा आवडीचा आहे. प्रचलित लोककथा व साहित्य परंपरेमध्ये मोठ्या प्रमाणावर उल्लेखिलेला हा पक्षी कवी, चित्रकार व गायकांमध्ये जास्त लोकप्रिय आहे. मधुबनी चित्रकला शैलीमध्ये शुक पक्ष्यांवर मोठ्या प्रमाणावर चित्रण केलेले आहे.

शुक (पोपट) श्रेणीमध्ये ३५० पेक्षा अधिक प्रजाती आढळून येतात. मकॉव, एमेजॉन, लॉरिकीट, लवबर्डस, कॉकटू आणि अशा प्रकारच्या इतर पक्ष्यांनाही 'शुक' असे संबोधले जाते. ह्या पक्ष्यांमध्ये बरीच विविधता असली तरी त्यांच्यामध्ये काही बाबतीत साम्य आढळते. या सर्व पक्ष्यांची चोच वक्राकार असते. त्यांच्या पायाला चार बोटे असतात, त्यात दोन पुढे व दोन मागे असतात. बहुतेक पक्षी फळे, फुले, कळ्या, धान्य तसेच छोटे छोटे किडेसुद्धा खातात. शुक (पोपट) पक्षी जगातील उष्ण जलवायू असलेल्या बहुतांश भागात आढळून येतात. ऑस्ट्रेलिया व दक्षिण अमेरिकेमध्ये सर्वाधिक वैविध्य दिसून येते.

भारतीय टपाल खात्यातर्फे विदेशी पक्ष्यांवर (Exotic Birds) सहा तिकिटांची मालिका प्रकाशित केली आहे. त्यापैकी काहींची माहिती आपण घेऊया.

**Blue Throated Macaw**

ही प्रजाती उत्तर-मध्य बोलिवीयाच्या लॉस लॉनोझ डिकोस्कोम नावाच्या छोट्या क्षेत्रात आढळून येते. तसेच ही प्रजाती जंगलात दिसून येते व जगातील अति दुर्मिळ शुक प्रजातींमध्ये प्रमुख स्थानावर आहे. ब्ल्यू थ्रोटेड मकावच्या शरीराचा खालचा भाग बहुतांश चमकदार पिवळ्या रंगाचा असतो. वरील भाग निळ्या रंगाचा असतो व वरील टोकाच्या बाजूस थोडा फिकट दिसतो व पाठीचा भाग चमकदार दिसतो. याचा अनावृत्त चेहरा पंखांनी झाकला जातो. तसेच गळा व गळ्याखालील भाग निळा असतो. मोठ्या काळ्या चोचीच्या जवळील त्वचा गुलाबी रंगाची असते. काळ्या चोचीच्या जवळ पंखासारखा त्वचेचा भाग दिसतो, ज्यात निळ्या रंगाच्या पंखाच्या ५ ते ६ क्षितिज रेषा दिसतात. ही प्रत्येक ब्लू थ्रोटेड मकावची वैशिष्ट्यपूर्ण ओळख आहे.

**Lesser Sulphur-crested Cocaktoo**

यास पिवळ्या तुऱ्याचा कॉकटू असेही संबोधले जाते. हा पक्षी पूर्वी तिमोरचे जंगल व शेतीच्या प्रदेशात आणि सिल्वासच्या इडोनेशियन बेटांवर आढळून येतो. पिंजऱ्यातील पक्षी व्यापार करणाऱ्यांनी यांची अवैधपणे शिकार केल्यामुळे या पक्ष्याची संख्या अत्यंत कमी झाल्यामुळे संकटग्रस्त पक्षी म्हणून याची गणना केली जाते.

मध्यम आकाराच्या कॉकटू पक्ष्याचे पांढरे पंख व निळसर पांढरी त्वचा फिकट रंगाचे पाय व काळी चोच, पिवळ्या अथवा नारिंगी रंगाचा वक्राकार तुरा डोक्यावर असतो. लेसर क्रेस्टेड कॉकटू हा झाडाच्या ढोलीत आपले घरटे करतो. अधिवासाच्या ऱ्हासामुळे त्यांची संख्या कमी होत आहे.

लेसर क्रेस्टेड कॉकटूच्या सहा उपप्रजाती असून सर्वात प्रसिद्ध उपप्रजाती किट्रोन कॉकटूची आहे. या पक्ष्याचा तुरा पिवळ्या ऐवजी नारिंगी रंगाचा असतो. हा केवळ सुम्बा बेटवरच आढळून येतो. दुसरी प्रजाती इंडोनेशियाच्या बेटावर आढळते.

**Hyacinth Macaw**

हायेसिंथ मकाव हा शुक प्रजातीचा पक्षी आहे जो मध्य तसेच दक्षिण अमेरिकेमध्ये आढळून येतो. याची लांबी साधारण १०० सें. मी. एवढी आहे, जी शुक प्रजातीमध्ये सर्वात मोठी मानली जाते. या पक्ष्याचे पंख पूर्ण निळ्या रंगाचे असतात. त्यास लांब टोकदार शेपूट असते. हा पक्षी ताड वृक्ष असलेल्या दलदलीच्या प्रदेशात रहातो. मुख्यत: जंगलाच्या बाहेरील प्रदेशातील मोकळ्या जागेत रहाणे पसंत करतो. हे पक्षी जोडीने उडताना दिसतात, तसेच खजुराच्या झाडावरील टणक फळे खातात. ह्या फळांना तोडणे खूप कठीण असते. हे पक्षी आपल्या शक्तीशाली चोचीने सुलभतेने त्याचे तुकडे करतात.

अधिवासाचा ऱ्हास तसेच पाळीव प्राण्यांच्या व्यापाऱ्यांकडून होणारी शिकार यामुळे या पक्ष्यांची संख्या खूप कमी झाली आहे. या पक्ष्याचा विशिष्ट आकार व सुंदरतेमुळे इतर शुक पक्ष्यापेक्षा जास्त मागणी असल्याने त्यास सर्वात जास्त त्रास दिला जातो. या पक्ष्यास संपूर्ण संरक्षण देण्यासाठी आंतराष्ट्रीय प्रकृती संरक्षण संघाच्या लाल सूचीमध्ये लुप्तप्राय प्रजाती म्हणून गणना केली आहे.

- रवींद्र वामनाचार्य

*मोबाईल : ९८९०३९०५२७,*

*इ-मेल : r_wamanacharya@yahoo.co.in*

---

## सहवेदना

पुणे येथील आपले एक सभासद **श्री. न. गुत्तीकर** यांचे ८२ व्या वर्षी निधन झाले. विज्ञानाचे पदवीधर असणाऱ्या गुत्तीकरांनी काही वर्षे राष्ट्रीय विषाणू विज्ञान या संस्थेत सेवा केली. लोकविज्ञान चळवळीत ते अग्रेसर होते. त्यांच्याच पुढाकारातून विज्ञान कॅलेंडर या उपक्रमाचा जन्म झाला.

'पक्षीमित्र'तर्फे त्यांना श्रद्धांजली.

पान ३ वरून...

# गाळपेरा - पाणपक्षी अधिवास धोक्यात

पक्षी व वन्यजीव अभ्यासकांच्या सहाय्याने एक गाळपेरा नियमावली तयार करण्यात यावी. बॅक वॉटर एरीयात एक सीमारेषा मानून त्यापुढे गाळपेरा करण्यास सक्त मनाई असावी. पाणथळ जागांचे सर्वात जास्त प्रमाणात शोषण होते हे लक्षात आल्यामुळे पाणथळीच्या जागांवर होणारं अतिक्रमण रोखणं आणि त्याचं संरक्षण करणं या उद्देशाने 'रामसार ठराव ' हा २ फेब्रुवारी १९७१ रोजी इराण येथील 'रामसार' या शहरामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर संमत झाला. १६९ पेक्षा जास्त देशांनी या ठरावाचे प्रतिनिधीत्व स्विकारले आहे. भारताने देखील प्रतिनिधीत्व स्विकाराले असून भारतातील सव्वीस पाणथळ जागांचा समावेश या यादीत करण्यात आलेला असून काही प्रस्तावित आहेत. त्यासाठी काही निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. ही निकषपूर्तता ही एक दीर्घ प्रक्रीया असून ते एक टीमवर्क आहे. आणि म्हणूनच रामसार यादीमध्ये समावेश होण्याकरिता वेळ लागतो. कित्येक महत्त्वाच्या व नावाजलेल्या पाणथळी अजूनही प्रतिक्षेत आहे. समाविष्ट पाणथळांचे संरक्षण करण्याची जबाबदारी सबंधित देशावर असते. या महत्वाच्या पाणथळांना आंतराष्ट्रीय महत्त्व प्राप्त होते. पण ज्या पाणथळी 'राममार'मध्ये येत नाहीत, त्याचं संरक्षण व संवर्धन कुठल्या कायद्याअंतर्गत होईल? अथवा कुठला कायदा लागू असेल? रिव्हर ॲक्ट, वाईल्डलाईफ ॲक्ट अश्या कायद्यांमध्ये हे अनुस्यूत असले तरी प्राधान्याने याच परिसंस्थेशी निगडीत विशेष कायदा अस्तित्वात नाही. म्हणून देशातील संबंध पाणथळ जागांना लागू होणाऱ्या कायद्याची गरज जाणवते; ज्यात पाणथळ संरक्षण व संवर्धनाबाबतचे धोरण व दिशानिर्देश असतील.

आपल्या कोणत्या कृतीमुळे वा अप्रत्यक्षपणे पक्ष्यांना धोका निर्माण होईल याचे अंदाज बांधता येत नाही आणि धोका लक्षात येतो तेव्हा वेळ निघून गेलेली असते. म्हणून संबंधितांचे लक्ष वेधण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

- दिलीप वीरखडे
वर्धा. मो. ७७७५८८३८६१, dilipvirkhade@gmail.com

# वर्धा येथील १७ वे विदर्भ पक्षीमित्र संमेलन

पान २ वरून...

पर्यावरणासंदर्भात जागतिक स्तरावर घेण्यात येणाऱ्या निर्णयाची अंमलबजावणी शासनातर्फे करण्यात यावी. (४) पाणस्थळावरील नायलॉन जाळे व फासे स्थानिक एनजीओंना घेऊन निर्मूलन करावे. इ. ठराव समारोपीय कार्यक्रमात पारित करण्यात आले. याप्रसंगी डॉ. जयंत वडतकर (महाराष्ट्र पक्षीमित्र), डॉ. बहार बावस्कर, अशोक भानसे (बोर व्याघ्र प्रकल्प) किशोर वानखडे, संजय इंगळे, तिगावकर, रविंद्र पाटील उपस्थित होते. या संमेलनात विदर्भासह महाराष्ट्रातील २०० प्रतिनिधींनी उपस्थिती दर्शविली. यापुढील अठरावे विदर्भ पक्षीमित्र संमेलनाचे यजमानपद यवतमाळच्या कोब्रा ॲडव्हेन्चर क्लब यांना देण्यात आले. क्लबचे शाम जोशी, जयंत अत्रे व त्यांचे सर्व सहकारी यांनी उपस्थितांना यवतमाळ येथील संमेलनाचे निमंत्रण दिले. समारोपीय कार्यक्रमांचे संचलन स्नेहल कुबडे तर आभार वैभव देशमुख यांनी मानले. संमेलन यशस्वितेसाठी राहुल तेलरांधे, राहुल वकारे जयंत सबाणे, चित्रा इंगोले, अविनाश भोळे, विनोद साळवे, सारीका मून, बी.एस. मिरगे यांनी प्रयत्न केले.

- दिलीप वीरखडे
(सचिव, बहार नेचर फाऊंडेशन, वर्धा)

## स्वागत नव्या सभासदांचे (२७ फेब्रुवारी २०१७ ते १९ मे २०१७)

| क्र. | नाव | जिल्हा | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| ९९७ | श्री. सारंग राजेंद्र पिंपरकर | नागपूर | - | sarang_pathfinder@photographer.net |
| ९९८ | श्री. बंडू सीताराम धोत्रे | चंद्रपूर | ९३७०३२०७४६ | ecoprochd@gmail.com |
| ९९९ | श्री. बंडू शंकर दुधे | चंद्रपूर | ९६२३२०९४६४ | - |
| १००० | डॉ. नागेश एस. टेकाळे | मुंबई | ९८६९६१२५३१ | nstekale@gmail.com |
| १००१ | प्रो. महेश सुनील आहेर | अहमदनगर | ९८८१४१८४४१ | ajinkya.aher@gmail.com |

## देणगी

| क्र. | नाव | जिल्हा | रक्कम | पावती क्र. | दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | संजीवनी वझे | मुंबई | ७,५००/- | २२७९ | ३१/०३/२०१७ |

उपक्रम -

## वन्यजीव व निसर्ग छायाचित्रकार अनिल माळी (नाशिक) यांचे


## *Moments In Nature*

हे त्यांनी टिपलेल्या छायाचित्रांचे प्रदर्शन मुंबईच्या प्रसिद्ध जहांगीर आर्ट गॅलरीत संपन्न झाले. हे प्रदर्शन १५ ते २१ मार्च २०१७ या दरम्यान भरविण्यात आले होते. प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी प्रसिद्ध वन्यजीव छायाचित्रकार श्री. आर. एल. कोठारी (काकूभाई) आणि श्री. बिभास अमोणकर हे उपस्थित होते. प्रदर्शनात निवडक असे पक्षी, प्राणी, कीटक, यांची भारतातील विविध अभयारण्यात टिपलेली ३५ छायाचित्रे प्रदर्शित करण्यात आली होती.

प्रदर्शनाला मा. किशोर रिठे, डॉ. राजू कसंबे, नंदिश सोनगिरे, नंदकुमार दुधे, राजू काकडे, तसेच फ्रान्स, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, हॉलंड, चीन, बेल्जीयम, इंग्लंड येथील वन्यजीव अभ्यासकांनीही भेट दिली.

अभिनंदन -

## कॅलिफोर्निया कॉन्ट्रास्ट



कोल्हापूर येथील आपले एक सभासद श्री. सुभाष पुरोहित यांना एका संस्थेचा पुरस्कार वरील छायाचित्राला मिळाला आहे. सिमेंटच्या तुकड्याला गेलेल्या छेदातून एका वृक्षाने वर डोके काढलेले आहे. हे छायाचित्र छापलेल्या वीस हजार प्रती भेटकार्डाच्या स्वरूपात त्या संस्थेकडून वितरित होणार आहेत. जमलेले पैसे गरजू लोकांना दिले जातील.

श्री. पुरोहित यांचे हे सातवे आंतरराष्ट्रीय पारितोषिक आहे. 'पक्षीमित्र' त्यांचे अभिनंदन करत आहे.

## मोनाल प्रजनन केंद्र

हिमालयीन मोनाल (Lophophorus impejanus) (मृणाल) हा अतिशय देखणा पक्षी आहे. त्याची संख्या अतिशय घटली आहे. म्हणून हिमाचल प्रदेश सरकारने Central Zoo Authority च्या परवानगीने मनाली येथे त्याचे प्रजनन केंद्र सुरू केले आहे.

(Protected Area Update वरून)

Registered with the Registrar of Newspaper in India under serial No. MAHMAR/2012/51349

**Book Packet containing periodicals**

प्रती,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षीमित्र
११, युनायटेड पार्क, मार्कंडी,
चिपळूण, जि. रत्नागिरी - ४१५ ६०५
फोन : (०२३५५) २५३०३०
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*

**पक्षीमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : प्रिंटवेल, नाशिक
मुद्रक : एस्. व्ही. प्रेस - चिपळूण
फोन : (०२३५५) २५२३३०